मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
एस.आर.ए.बिल्डींग, ए-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051.
फोन व फॅक्स-022 26591586, Email:-ccfmangrove@mahaforest.gov.in/ccfmmumbai@gmail.com

विषय :- कोकण विभागातील वेटलँड संदर्भात
पाणथळ तक्रार निवारण समितीची
बैठक. दि. 08/12/2016.

जा.क्र.उप.व/कांकमुं/सभा/2434/2016-17
बांद्रा. दिनांक :- 23/12/2016

प्रति,

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
4. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
   संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
5. मा. संचालक पर्यावरण विभाग.
6. मा. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
7. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
8. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
9. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
10. डॉ. महेश शिंधीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.
11. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.

उपरोक्त विषयान्वये नवी मुंबईतील कांदळवन संरक्षणासाठी नियुक्त केलेल्या सनियंत्रण समितीची बैठक दिनांक 08/12/2016 रोजी सायंकाळी 4.00 वाजता विभागीय आयुक्त कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट मुंबई येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजुर इतिवृत्त माहिती पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे त्याबाबतचा अनुपालन अहवाल पुढील बैठकीत सादर करावा, ही विनंती.

(जयरामेगौडा)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

## विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ निवारण समितीची बैठक

**दिनांक** 08/12/2016.

समितीची अकरावी बैठक दिनांक 08/12/2016 रोजी दुपारी 4.30 वाजता विभागीय आयुक्तांचे कार्यालय कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात आली. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | मा. श्री. प्रभाकर देशमुख | विभागीय आयुक्त, कोकण भवन | विभागीय आयुक्त |
| 2 | श्री. एन वासुदेवन | मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | मुख्य वन संरक्षक |
| 3 | श्री. जयरामेगौडा | मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई. | उपवनसंरक्षक |
| 4 | श्री. डॉ. भाऊसाहेब दांगडे | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, (महसूल) | उच्च आयुक्त (महसुल) |
| 5 | श्री. हिरालाला सोनवणे | अपर आयुक्त, कोकण | अपर आयुक्त |
| 6 | श्री. रविंद्र सावळकर | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग | अपर जिल्हाधिकारी |
| 7 | श्री. पी. डी.मलिकनेर. | अपर जिल्हाधिकारी, रायगड | अपर जिल्हाधिकारी |
| 8 | श्री. एस. जी. देशमुख | कलेक्टर, पालघर | अति. कलेक्टर |
| 9 | श्री. अशोककुमार रणखांब | अतिरिक्त आयुक्त, ठाणे महानगरपालिका | अतिरिकत् आयुक्त |
| 10 | श्री. अंकुश चव्हाण | अति. आयुक्त, NMMC | अति. आयुक्त NMMC |
| 11 | श्री. विक्रम देशमाने | डी.सी.पी. | पोलिस विभाग यांचे प्रतिनिधी |
| 12 | श्री. एम. एम. पंडितराव | विभागीय वनअधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक | विभागीय वन अधिकारी |
| 13 | श्री. डॉ. सुनिल लहाने | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका | उपआयुक्त |
| 14 | श्री. पुजारी दिपक | मिरा-भाईंदर महानगरपालिका | उप आयुक्त |
| 15 | श्री. डॉ. किशोर शां. गवस | उप आयुक्त, वसई | उपआयुक्त |
| 16 | श्री. एस. के. सेलवन | Executive Engineer, UMC | Executive Engineer, UMC |
| 17 | श्री. आर. एस. राठोड | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका | सहाय्यक संचालक, नगर रचना |
| 18 | श्री. स्टॅलिन डी | वनशक्ति | संचालक |
| 19 | श्री. डॉ. महेश शिंदीकर | अभियांत्रिकी महाविदयालय, पुणे | सहाय्यक प्राध्यापक |
| 20 | श्रीमती. वंदना सुर्यवंशी | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रतिनिधी |
| 21 | श्री. जयंत निकम | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई | जिल्हाधिकारी मुंबई यांचे प्रतिनिधी |
| 22 | श्री. पी. जे. थोरात | ADTP Palghar | TP |
| 23 | श्री. चंद्रशेखर म्हात्रे | सिडको | टी. ओ. |
| 24 | श्रीमती मनिषा परब | टि.एम.सी. | टि.एम.सी यांचे प्रतिनिधी |

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची तिसरी मासिक बैठक.

दिनांक 08/12/2016

स्थळ विभागीय आयुक्त कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट मुंबई.

10

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. 08/12/2016 रोजी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेमध्ये खालीलप्रमाणे मुद्देनिहाय विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कारवाई | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १. | Brief Document तयार करणे. | वनविभागाने उपलब्ध केलेल्या Brief Document चा आधार घेऊन् जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेतातील 500 हेक्टर वरील पाणथळ जागा असल्यास त्याचे Brief Document तयार करणे व त्याची माहिती अध्यक्षांना तथा विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना सादर करणे. | जिल्हाधिकारी सर्व. दिनांक 02/01/2017 |
| 2. | सदर समितीचा (कोकण वेटलँड तक्रार निवारण समिती) प्रचार व प्रसिद्धी करणे. | वेटलँडच्या ऱ्हासा संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीकरिता website तयार करणे. स्वतंत्र वेबसाईट उघडण्यास कालावधी लागणार असल्याने सद्य स्थितीत उपलब्ध ई-मेल आयडीवर जनतेच्या तक्रारी स्विकारण्यात याव्यात.<br><br>2. जिल्हाधिकारी सर्व ( मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) यांनी पत्रकार परिषद घेऊन समिती गठीत झाल्याबद्दल आणि समितीच्या कामकाज व कर्तव्याबद्दल तसेच वेटलँड तक्रार निवारण यंत्रणा तयार झाल्याबाबत प्रत्येक तहसिल कार्यालयात त्याची पुरेशी प्रसिद्धी करणे. | सदस्य सचिव पाणथळ तक्रार निवारण समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई.<br><br>जिल्हाधिकारी सर्व (मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) |
| 3. | जनहित याचिका क्र. 87/2013 मा. उच्च न्यायालयाच्या अंमलबजावणीसाठी मा. न्यायालय अंतरिम निर्णयातील अंमलबजावणी करावयाच्या आदेशांची यादी तयार करणे. | सदर आदेशांची यादी तयार करावी व सर्वांना आदेशांच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. | समिती सचिव |
| 4. | विविध ठिकाणी होणाऱ्या वेटलँडच्या ऱ्हासाबद्दल आढावा घेणे. | मौजे मालाड येथील नेव्हीच्या जागी असणाऱ्या तलावावर भर चालू असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली होती. तसेच मालाड, मढ, कांदिवली येथील भराव होत असल्याबाबत तक्रार, यासंदर्भात संयुक्त | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि उप आयुक्त मुंबई महानगर पालिका, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्थळपाहणी करुन सविस्तर अहवाल समितीस सादर करणे. | समितीचे सदस्य सचिव. |
| 5. | वेटलॅंड ऱ्हासाच्या तक्रारी व करावयाची कारवाई. | तक्रार प्राप्त होताच त्याची 8 दिवसामध्ये चौकशी पूर्ण करुन दोषींविरुद्दध कारवाई करणे आणि ती तक्रार निकाली काढणे.<br><br>अ) वनक्षेत्राव्यतिरिक्त असणारे वेटलॅंड ऱ्हासा संदर्भात संबंधित महसूल विभागाने पर्यावरण संरक्षण कायदेअंतर्गत तात्काळ कायदेशीर कारवाई करावी. तसेच महसूल विभागाला संबंधित पोलीस यंत्रणेने कायदेशीर कारवाई करण्यामध्ये आवश्यक सहकार्य करावे.<br><br>ब) वनविभागाच्या क्षेत्रामधील वेटलॅंड ऱ्हासासंदर्भात संबंधित वनकायद्दयांतर्गत दोषींविरुद्दध कारवाई करणे.<br><br>2. तक्रारी करिता स्वतंत्र रजिस्टर तयार करुन त्यामध्ये केलेल्या कारवाईच्या तपशीलाचा नोंद घेणे. | महसुल विभाग , पोलीस विभाग व वन विभाग.<br><br>महसुल विभाग , पोलीस विभाग.<br><br>संबंधित वनविभाग.<br><br>समितीचे सदस्य सचिव.<br>संबंधित सर्व यंत्रणा |
| 6. | मासिक बैठकांची माहिती व सभेचे विषय यांची माहिती सदस्यांना देणे | सभेला उपस्थित राहणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांची (Nodal Officer) माहिती व त्यांचे ई-मेल आयडी आणि पत्ते सचिव वेटलॅंड तक्रार निवारण समिती यांना कळविणे.<br><br>2. नियोजित सभेचे विषयपत्रीका (agenda) सदस्यांना कळविणे.<br><br>3. विषयपत्रिकेनुसार बैठकीला उपस्थित राहताना विभागाने केलेलया कार्यवाहीची टिप्पणी स्वरुपात माहिती घेऊन येणे. | समिती सदस्य, वेटलॅंड तक्रार निवारण समिती.<br><br>सदस्य सचिव, वेटलॅंड तक्रार निवारण समिती.<br><br>समिती सदस्य, वेटलॅंड तक्रार निवारण समिती. |

सदर सभेस उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

सदस्य सचिव
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई.